।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

**GARDEN SECTION**

Phone: (02462) 229572 website: srtmun.ac.in e-mail:srtmungardensuperintendent@gmail.com

जा.क्र: उद्यान/आस्था/३/२०१८–१९ / ७२ दि. ०४/ १० /२०१८

## परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित नांदेड जिल्हातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात दि. ०१ जुलै २०१९ ते दि. ३१ जुलै २०१९ दरम्यान ३३ कोटी वृक्ष रोपांची लागवड करण्याचा शासनाचा मानस आहे. या उपक्रमा अतंर्गत उच्च शिक्षण विभाग नांदेड करिता २४२०० वृक्ष रोप लागवडीचे उध्दीष्ट देण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात दि. ०१ जुलै, २०१९ पासुन किमान २०० वृक्ष रोपांची वा शक्य असल्यास त्यापेक्षा जास्त वृक्ष रोपांची लागवड करण्याचे नियोजन करावे.

सदर कार्यक्रमात आपल्या महाविद्यालयात " एक मूल एक वृक्ष " योजना राबविण्यात यावी. वृक्ष रोपांची लागवड संगोपन, संरक्षण व संवर्धनासाठी विविध कामे लोक सहभागातून स्वयंस्फुर्तीने करण्यात यावीत व त्याकरिता महाविद्यालय स्तरावर प्रबोधनपर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

वृक्ष दत्तक घेऊन संगोपन करण्याकरीता वृक्ष दत्तक नोदंणी व हरित सेना सदस्य नोदंणी वन विभागाच्या या http://greenarmy.mahaforest.gov.in/ संकेतस्थळवर करावी. वृक्ष रोप लागवड व संगोपन करण्याकरिताच्या उपाय योजनासह आराखडा कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी व सर्व कार्यवाहीचा अहवाल निन्म स्वाक्षरीकर्त्याकडे पाठविण्यात यावा. जेणे करून सदर माहिती शासनास पाठविने सोईचे होईल.

कुलसचिव

नोट : सर्व माहीती मराठी मध्ये File type : word 1997-2003 / Font : Kruti Dev 055 / Font size : 16 त srtmunregistrar@gmail.com या ई मेल वर पाठविण्यात यावी.